# दिनांक 05/04/2025

| |
|---|
| 1 पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 03/04/2025 रोजी 18:30 वा च्या सुमारास मौजे दातारआळी ता.पेण येथील महिला फिर्यादी यांचे राहते घरात, ता-पेण येथे पती आरोपी याने दारु पिवुन फिर्यादी यांची मुले व फिर्यादी यांना शिवीगाळ करुन फिर्यादी यांना हाताबुक्याने मारहाण करुन जोराने ढकलुन दिल्याने त्यात फ्रयिादी हया खाली पडुन त्यांचे उजवे हाताला दुखापत झाली.<br>याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं.61/2025 भा.दं.वि.क.117,352 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/पाटील हे करीत आहेत. |
| 2. खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 04/04/2025 रोजी 08:00 वा च्या सुमारास मौजे पुणे मुंबई एक्सप्रेस हायवेवर खोपोली एक्झिट येथे कि.मी.नं.39/600 जवळ ता.खालापुर येथे आरोपीत चालक याने त्याचे ताब्यातील कंटेनर ट्रक क्र.एन.एल.01.एडी.9117 हा पुणे बाजुकडुन मुंबई बाजुकडे घेवुन जात असताना वरील ठीकाणा आलेवेळी ट्रक हा अतिवेगाने, हयगयीने, अविचाराने, बेदरकापणे, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लेक्ष करून धोकादायक रित्या चालवुन फिर्यादी यांच्या टुरिस्ट स्विफट कार क्र.एम.एच 14.के.क्यु.2996 हीस पाठीमागील बाजुस ठोकर मारून न थांबता पुढे जावुन समोरील ट्रक क्र. के.ए.56.3063 यास पाठीमागील बाजुस ठोकर मारून अपघात करून अपघातात स्वत:चे साध्या दुखापतीस व वरील तिनही वाहनांच्या नुकसानीस कारणीभुत झाला.<br>याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.94/2025, भारतीय न्याय संहीता कलम 281,125(अ) मो.वा.का.क.184 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/सावंत ह्या करीत आहेत. |
| 3. खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 03/04/2025 रोजी 11:00 वा च्या सुमारास मौजे शेमडी गावच्या हददीत पाली खोपोली रोडवरील वळणावर ता.खालापुर येथे आरोपीत याने त्याचे ताब्यातील आयशर टेम्पो क्रमांक एम.एच..18 बी.झेड /8060 हा खोपोली बाजुकडुन पाली बाजुकडे रोडने घेवुन जात असताना नमुद ठिकाणी आलेवेळी आरोपीत यांनी त्याचे ताब्यातील टेम्पो हायगयीने ,अविचाराने,बेदरकारपणे व रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालविल्याने रस्त्याचे विरुध्द बाजुस जावुन समोरुन पाली बाजुकडुन खोपोली बाजुकडे जाणारी फिर्यादी यांची सुझुकी एस एक्स 04 क्रमांक एम.एच 12 पी.सी/ 7026 हिस समोरुन जोरात ठोकर मारुन अपघात करुन सदर अपघातात फिर्यादी प्रविण शहाती धडे व महानंदा शहाजी धडे , करीष्मा |

प्रविण धडे, अज्ञश प्रविण धडे, तनीश प्रविण धडे सर्व रा.पोलीस ऑफिसर कॉटर्स लाईन नं.03 तिसरा माळा रूम नं.302 ,महाड ता.महाड जखमी साक्षीदार यांचे लहान मोठया गंभीर स्वरूपाच्या दुखापतीस होण्यास व फिर्यादी यांचे कारचे व स्व:ताचे ताब्यातील टेम्पाचे नुकसानीस कारणीभुत होवुन अपघाताची खबर न देता पळुन गेला

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं.114/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 134,184, भा.न्या.सं.2023 चे 281,125(a),125(b) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सफौ/पाटील करीत आहेत.

4. पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 04/04/2025 रोजी 12:15 वा च्या सुमरास मौजे प्रायव्हेट हायस्कुल पेण येथुन, महिला फिर्यादी यांचे प्रायव्हेट हायस्कुल पेण येथे शिकत असलेला त्यांचा विदयार्थी पिडीत वय 14 यास कोणत्यातरी अज्ञात कारणाची फुस लावुन कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे समंतीशिवाय त्यांचे कायदेशीर रखवालीतुन पळवुन नेला.

याबाबत पेण पोलीस ठाणे गु र नं 62/2025, 137(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/शिरगावकर करीत आहेत.

5. वडखळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 04/04/2025 रोजी 13:00 वा च्या सुमारास मौजे जे.एस.डब्ल्यु कंपनी डोलवीचे अलिबाग गेटजवळील ब्रीजखालील पीआर ऑफिसचे कॉन्फरन्स हॉलच्या बाहेर ता.पेण येथे फिर्यादी रा.हमरापूर ता.पेण यांनी त्यांचे जमिनीचा वैयक्तीक विषय जे .एस.डब्ल्यु कंपनीच्या कॉन्फरन्स हॉलच्या मध्ये झालेल्या मिटींगमध्ये मांडला या गोष्टीचा आरोपीत यास राग येवुन आरोपीत हा हिंदु आगरी या उच्च वर्णीय समाजाचा असुन त्याने फिर्यादी हे बौध्द समाजाचे आहेत हे माहित असताना देखील त्याने फिर्यादी यांना जातीवाचक महारडया तु खुप मोठा झाला का व महार बोलुन हाताबुक्याने मारहाण करून शिवीगाळी व धमकी दिली.

याबाबत वडखळ पोलीस ठाणे गु.र.नं.34/2025, BNS 115(2),352,351(2)(3), अनुसुचित जाती/जमाती अधिनियम 1989 चे कलम 3(1)(r)(s), अनुसुचित जाती प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास श्री.गजानन टोम्पे मा.उपविभागीय पोलीस अधिकारी, पेण करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 04.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 274 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 3,10,000/-रुपये इतका दंड आकारला आहे.